माहितीचा
अधिकार

# राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई

१३ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२ २२०४००९५.

website: sic.maharashtra.gov.in    e-mail: do1.sic@maharashtra.gov.in

## जाहीरात

### "सेवानिवृत्त कक्ष अधिकारी" यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत...

राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठामध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्राप्त द्वितीय अपीले / तक्रारींवरील व विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठात खालील रिक्त पदावर मंत्रालयीन सेवेतून सेवानिवृत्त कक्ष अधिकाऱ्याची करार पध्दतीने नेमणूक करावयाची आहे.

| पद | रिक्त संख्या |
|---|---|
| कक्ष अधिकारी | १ |

सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.संकीर्ण/२०१७/प्र.क्र.१००/१३ दि.१७.१२.२०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार करण्यात येईल. याबाबतची अधिक माहिती आयोगाचे संकेतस्थळ https://sic.Maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुक व्यक्तींनी वेबसाइटवरील माहिती पाहून, सह सचिव, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांचेकडे दि. १४.०८.२०२४ पर्यत अर्ज करावा. त्यानंतर प्राप्त अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

(श्या. र. चौरे)
सह सचिव

# अर्जाचा नमुना

राज्य माहिती आयोगाकडे प्राप्त द्वितीय अपीले / तक्रारीं व इतर विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी
राज्य शासनाच्या मंत्रालयीन सेवेतून सेवानिवृत्त कक्ष अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती

१. अर्जदाराचे संपुर्ण नाव :-

२. अर्जदाराचा संपुर्ण पत्ता :-

३. सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम :-

४. भ्रमणध्वनी क्रमांक :-

५. जन्म दिनांक व वय :-

६. शैक्षणिक अर्हता :-

७. अनुभव :-

उपरोक्त पदावर करार पध्दतीने नियुक्तीची जाहिरात/सुचना मी काळजीपुर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

**राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे प्राप्त द्वितीय अपीले / तक्रारीं व इतर विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी राज्य शासनाच्या मंत्रालयीन सेवेतून सेवानिवृत्त कक्ष अधिकाऱ्याची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत अटी व शर्ती :-**

१) सदर नियुक्ती केवळ सहा महिन्यांच्या कालावधीकरीता अथवा शासनाकडून नियमित कक्ष अधिकाऱ्याची नियुक्ती होईपर्यंत असेल.

२) सदर सेवानिवृत्त अधिकारी "कक्ष अधिकारी" दर्जाच्या / समकक्ष पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा. त्यापेक्षा कमी दर्जाच्या पदावरुन सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी कृपया अर्ज करु नयेत. सदर अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

३) ***मुंबई शहर व उपनगर किंवा एम.एम.आर.डी.ए.क्षेत्रातील अर्जदारानेच कृपया करार पध्दतीने नियुक्तीकरीता अर्ज करावा.***

४) सदर सेवानिवृत्त कक्ष अधिकारी मानसिक, शारिरिक व आरोग्यदृष्टया सक्षम असावा व त्यांचे वय ६० वर्षापेक्षा अधिक नसावे.

५) करार पध्दतीने नियुक्ती दिलेल्या सेवानिवृत्त कक्ष अधिकारी यांना राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ येथे काम करावे लागेल.

६) कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त कक्ष अधिकारी मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ यांच्या नियंत्रणाखाली काम करील.

७) इच्छुक उमेदवाराने आपला अर्ज दिनांक १४.०८.२०२४ पर्यत "सह सचिव, राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ, १३ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालयासमोर, मादाम कामा मार्ग, मुंबई-४०० ०३२" या पत्त्यावर पोहोचेल अशा रितीने पाठवावा. विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही. तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.